मे.पांडुरंग हरी वैद्य
ज्वेलर्स
संजय मोरेश्वर पोतदार ग्रुप कंपनी
BIS
हॉलमार्क दागिने
M.T.N.L. रोड, मिडल क्लास सोसायटी, पनवेल
फोन : ०२२-२७४५४४११

Website : www.killeraigad.com
दैनिक
# किल्ले रायगड
रायगड जिल्हा आणि नवी मुंबईचे अग्रेसर वृत्तपत्र
संपादक : प्रमोद लक्ष्मण वालेकर
सोमवार खेरीज दररोज प्रसिध्द होणारे

विरेंद्र ज्वेलर्स
विरेंद्रकुमार रतनचंद बांठिया ज्वेलर्स
९१६ हॉलमार्कचे दागिने सौंदर्याचं लेणं
४, महात्मा गांधी रोड, बाजारपेठ, पनवेल-४१० २०६.फोन : ०२२-२७४५ १९८८
E-mail : virendrajewellers@mtnl.net.in

❒ वर्ष ५६ वे : अंक १७८ वा ❒ पनवेल ❒ रविवार दिनांक १९ मार्च २०२३ ❒ किंमत : २/- रुपये मात्र E-mail:killeraigad@gmail.com

# बेमुदत संपात सहभागी झालेल्या कोकण भवनसह ७ जिल्ह्यातील ३८५९ महसुली कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**नवी मुंबई दि. १८ (वार्ताहर) : जुनी पेन्शन लागू व्हावी या मागणीसाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना तसेच शासनाच्या विविध विभागातील सर्व संघटनांनी एकत्र येऊन बेमुदत संप पुकारलेल्या कर्मचाऱ्यांचे संप कालावधीतील वेतन कपात करण्याचा इशारा परिपत्रकाद्वारे संपकरी कर्मचाऱ्यांना देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येवू नये अशा प्रकारची कारणे दाखवा नोटीस देखील बजावण्यात आली आहे.**

कोकण विभागीय आयुक्त कार्यालयातील तसेच त्यांच्या अधिपत्याखालील या बेमुदत संपात सहभागी झालेल्या कोकण भवनसह ७ जिल्ह्यातील एकुण ३८५९ महसुली कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. असे असले तरी संपकरी कर्मचाऱ्यांनी आपला संप सुरुच ठेवला आहे.

राज्यातील विविध शासकीय, निमशासकीय कर्मचारी संघटना, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संघटनानी जुनी पेन्शन योजना लागू करावी यासह इतर मागण्यांसाठी सुरु केलेल्या संपात राज्यातील जवळपास १७ लाखाहुन अधिक कर्मचारी सहभागी झाले आहेत. या संपावर तोडगा न निघाल्याने पाचव्या दिवशी देखील हा संप सुरुच ठेवला आहे. त्यामुळे विविध शासकीय कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या अभ्यंगतांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे राज्य सरकारने बेमुदत संप पुकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर निवृत्ती वेतन देय असताना देखील त्यांनी बेमुदत संप पुकारल्याने त्यांची हि कृती अशोभनिय असल्याचे राज्य सरकारकडुन स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे काम नाही वेतन नाही हे धोरण राज्य शासनाकडुन अनुसरण्यात येत असल्याचे तसेच या संपामध्ये सहभागी झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो असा इशारा राज्य सरकारकडुन कर्मचाऱ्यांना देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यां विरोधात शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येवू नये, याबाबत कार्यालयात समक्ष उपस्थित राहून खुलासा करण्याचे सुचित करण्यात आले आहे.

अन्यथा त्यांच्यावर पुढील योग्य ती कारवाई करण्याचा इशारा नोटीसीद्वारे देण्यात आला आहे.

नोटीस बजावण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या त्यानुसार कोकण विभागीय आयुक्त कार्यालयातील तसेच त्यांच्या अधिपत्याखालील ७ जिल्ह्यातील ४२४० महसुली कर्मचाऱ्यांपैकी संपात सहभागी झालेल्या ३८५९ कर्मचाऱ्यांना कोकण विभागीय सामान्य प्रशासन विभागाने नोटीसा बजावल्या आहेत. यात कोकण विभागीय आयुक्त कार्यालयातील ६९, मुंबई शहर- २२६, मुंबई उपनगर- ४७४, ठाणे-६७१, पालघर- ३९७, रायगड- ८५८, रत्नागीरी-६८६, सिंधुदुर्ग -४७८ या महसुली कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

# नोकरी, व्यवसाय व रेल्वे स्थानकाच्या नामकरणासाठी सिडको व रेल्वे प्रशासन कार्यालयावर २३ मार्चला मोर्चा

**उरण दि.१८( वार्ताहर) : धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील मौजे शेमटीखार येथील रांजणपाडा रेल्वे स्थानकाचे नाव दुरूस्त करून धुतूम रेल्वे स्थानक असे नामकरण करण्यात यावे, तसेच सदर रेल्वे स्थानकात धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील बेरोजगार तरुणांना नोकरीत सामावून घेण्यात यावे,आणि प्रकल्पग्रस्त शेतकरी यांना उदरनिर्वाहासाठी सदर रेल्वे स्थानकात व्यवसाय उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी या मागणीसाठी धुतूम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामस्थांनी एकदिलाने सिडको आणि रेल्वे प्रशासन कार्यालयावर २३ मार्च रोजी सकाळी ठिक १०-३० वा. मोर्चा काढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.**



धुतूम ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ सुचिता प्रेमनाथ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली नूकताच धुतूम ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपस्थित आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ यांनी एकदिलाने चर्चा करताना सांगितले की लोकनेते दि.बा.पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या १९८४ सालच्या शेतकरी लढ्यात धुतूम गावातील शेतकऱ्यांनी हिरीरीने सहभाग घेतला होता.या लढ्यात धुतूम गावातील शेतकरी रघुनाथ अर्जुन ठाकूर यांना वीरमरण प्राप्त झाले होते.अशा

▶ वृत्त पान ४ वर

# सफाई कामगारांना वारसा हक्कांच्या लाभाची माहिती देण्यासाठी बैठकीचे आयोजन



**पनवेल,दि.१८ (प्रतिनिधी) : पनवेल महानगरपालिकेतील सर्व कायम सफाई कामगारांना वारसा हक्कांच्या लाभाबाबत माहिती देण्याकरीता आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी दिलेल्या निर्देशानूसार दि. १७ मार्च रोजी पनेवल महानगरपालिकेच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती.**

यावेळी सहाय्यक आयुक्त नामदेव पिचड, स्वच्छता विभाग प्रमुख अनिल कोकरे, प्रभाग अधिकारी दिपक शिलकन, आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, रोशन माळी, सर्व स्वच्छता निरीक्षक, सफाई कर्मचारी उपस्थित होते.

▶ वृत्त पान ४ वर

# सुषमा स्वराज पुरस्काराने सन्मानित महिलांचे मराठा महासंघाकडून अभिनंदन



**पेण दि. १८ (प्रशांत पोतदार): जागतिक महिला दिनानिमित्ताने भारतीय जनता पार्टी दक्षिण रायगड आयोजित कार्यक्रमात समाजात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना आदरणीय सुशमा स्वराज पुरस्कार २०२३ भाजप महिला अध्यक्षा चित्राताई वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत पेण येथे प्रदान करण्यात आले.**

यावेळी अतिदुर्गम भागात अखंडित वैद्यकीय सेवा पुरवल्याबद्दल तसेच महिला दिनी गेली ५ वर्षे खेडेगावामध्ये मोफत आरोग्य शिबीर आयोजित केल्याबद्दल डॉक्टर सौ

▶ वृत्त पान ४ वर

# वयोवृध्द महिलांचा पाठलाग करून चैन चोरणारा ओला चालक गजाआड २॥ लाखाचा मुद्देमाल जप्त

**पनवेल दि.१८(संजय कदम): वयोवृध्द महिलांचा पाठलाग करून चैन जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास मुंब्रा पोलीसांनी अटक करून त्याच्या कडून २,५१,१४८ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**



मुंब्रा पोलीस ठाणे हददीतील दिवा शहर परिसरात वयोवृध्द महिलांना टार्गेट करून त्यांचा पाठलाग करून सदर महिला राहत्या इमारतीमध्ये जिन्याने घरी जात असताना अनोळखी आरोपी हा त्यांच्या गळयातील सोन्याचे दागिने जबरीने खेचून पळून जात होता.

▶ वृत्त पान ४ वर

डिझायनर इंटिरिअर अँड लँडस्केपिंग
आपल्या घराचे, बंगल्याचे, ऑफिसचे, दुकानाचे मनमोहक
इंटिरिअर तसेच फार्म हाऊस डेव्हलपिंग व गार्डनिंग आपल्या बजेटप्रमाणे करुन मिळेल
अनिल मेहेतर
९१६७५५३७३७/ ९०८२२४६५०४

PKB
पन्नालाल केशरचंद बांठिया
सोने, चांदीचे व्यापारी
७७६, एम.जी. रोड, पनवेल-४१० २०६, जि. रायगड.
फोन : ऑ. 2749 1303 ❒ नि. 2745 2326
पनवेल मधील सर्वात जुनी व खरी पेढी

RKB
राजेंद्र कांतीलाल बांठिया
ज्वेलर्स
११, आर. बी. रंगपरिया रोड, मिरची गल्ली, पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र- ४१० २०६.
मो.९३२२३३३३८७/९७०२३३३३८७

PRINCE CREATIONS PVT.LTD.
Kids, Men's & Ladies Wear House of Readymade Garments.
PRINCE COLLECTION
(A Complete Family Showroom)
Shop No. 1/2/3/4 Prabhakar Raje Complex, Shivaji Chowk, Tal. Panvel, Raigad-410206.Ph. No. 022-27461001/27492002
Email- princecreation1001@gmail.com

संपादकीय.....

# तथ्यांचा मुळापासून विचार हवा

मागील आर्थिक वर्षात पगार, पेन्शन आणि व्याज यावर महाराष्ट्र सरकारची ६४ टक्के रक्कम खर्च झाली. राज्यात २० लाख कर्मचारी हवे असताना साडेपाच लाख जागा रिक्त आहेत. निवृत्त झालेले दोन लाख ८९ हजार कर्मचारी भरलेलेच नाहीत. हे साडेपाच लाख कर्मचारी भरले, तर पगारावरचा खर्च किती वाढेल, याचा विचार करायला हवा. आंतरराष्ट्रीय निकषांनुसार प्रशासन खर्च १८ टक्क्यांपेक्षा कमी असावा. शासकीय तिजोरी ही कल्याणकारी योजनांसाठी आहे की पगार- पेन्शनसाठी आहे याचा विचार करावा लागेल. राज्यात कर्मचारी कुटुंबीयांसह फार तर दीड कोटी इतकी असतील. म्हणजे ८.५ टक्के कर्मचाऱ्यांसाठी ५८ टक्के रक्कम खर्च करणे योग्य आहे का? याच राज्यात भटक्या विमुक्तांची संख्या दीड कोटी इतकी आहे; पण त्यांच्यासाठी अगदीच अल्प तरतूद आहे. सहा लाख कर्मचाऱ्यांच्या पेन्शनवर आपण ६७ हजार कोटी रुपये खर्च करत आहोत. आपल्या पेन्शनपेक्षा जास्त महत्वाचा मुद्दा कंत्राटी कर्मचारी सेवेत घेणे हा असला पाहिजे. ते बिचारे वर्षानुवर्षे सर्व विभागांमध्ये राबत आहेत. त्यांच्याकडे कोणीच लक्ष देत नाही. लग्न होऊनही अनेकजण १०-१५ हजार रुपयांमध्ये गुजराण करतात. महाविद्यालयात ठराविक कामापोटी एकजण दोन लाख रुपये पगार घेत असताना दुसरा कंत्राटी कर्मचारी अल्प मानधनात तेच काम करतो. हे सर्व वास्तव विचारात घेऊन आपल्याला जुनी पेन्शन देण्यासाठी जे अनेक उपाय करावे लागतील, त्यात राज्याचा प्रशासन खर्च हा ३५ -४० टक्के केला, तर सर्वांना पेन्शन देणे शक्य होईल का, याचा विचार करावा लागेल.

हे वास्तव मान्य केल्यावर आपल्यापुढे दोनच पर्याय आहेत. ते म्हणजे राज्याचे उत्पन्न किमान एक लाख कोटी रुपयांनी वाढायला हवे. दुसरा उपाय म्हणजे जे पूर्वीपासून सेवेत आहेत, त्यांनी आज त्यागाची तयारी ठेवायला हवी. हा दुसरा उपाय कटू वाटेल पण महत्वाचा आहे. सिंगापूरमध्ये कर्मचाऱ्यांनी जशी पाच टक्के वेतनकपात मान्य करायची तयारी दाखवली, तशी ७० हजारांपेक्षा जास्त वेतन असणाऱ्यांनी कपातीची तयारी दाखवायला हवी. दुसरा मुद्दा म्हणजे जसे किमान वेतन असते, तसे कमाल वेतनही ठरवायला हवे. आज शासकीय सचिव, जिल्हाधिकारी, प्राध्यापकाचे वेतन दीड-दोन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. या मोठ्या वेतनात कपात करून सीलिंग ठेवायला हवे. विशिष्ट रकमेच्या पुढे कुणाचेही वेतन वाढणार नाही, अशी कठोर भूमिका घेतली, तरच प्रशासन खर्च कमी होईल. आणखी एक मुद्दा म्हणजे आज प्रथम वर्ग, द्वितीय वर्गातील नोकरदारांचे वेतन दोन लाखांच्या आसपास तर तृतीय वर्गातील शिक्षक, प्राध्यापकांपैकी अनेकांचे वेतन लाखाच्या पुढे जाते. त्यांची पेन्शनही ५० हजार ते लाख रुपयांच्या घरात असते. पती-पत्नी नोकरीत असतील तर एका कुटुंबात दोन पेन्शन मिळतात. एकीकडे इतके पगार असताना, कंत्राटी कामगार मात्र अत्यल्प रकमेत राबतात. उत्तम नोकरी असणाऱ्यांची नुसती पेन्शन लाख रुपयांपर्यंत जाते. या पार्श्वभूमीवर देशात ५० हजार रुपयांच्या पुढे कोणालाच पेन्शन असणार नाही, असा नियम स्वीकारायला समाज तयार आहे का, एका घरात एकच पेन्शन मिळेल असा निर्णय लोक स्वीकारणार का असे प्रश्न आज समोर आहेत. कारण आपण त्याग केला तरच प्रशासकीय खर्च कमी होणार आहे.

पती-पत्नी सेवेत असतील, तर एकालाच महागाई भत्ता आणि एकालाच घरभाडे भत्ता मिळेल असाही नियम करायला हवा. एकत्रीकरण असेल आणि एकाच घरात राहत असतील तर दोन भाडी कशासाठी, असे अनेक निकष लावले पाहिजेत. ७० हजार रुपयांपेक्षा जास्त वेतन घेणाऱ्यांनी त्यागाची तयारी दाखवली पाहिजे. आमचे हक्क सुरक्षित ठेवा आणि तरीही नोकरभरती करा, कंत्राटी कर्मचारी नेमू नका, सर्वांना पेन्शन द्या असा कोरडा पाठिंबा देण्यात अर्थ नाही. तुम्ही त्याग करणार आहात का, हा खरा प्रश्न आहे. प्रशासनावरचा खर्च कमी झाला तरच जुनी पेन्शन, कंत्राटी कर्मचारी नेमणूक थांबणे, नवीन नोकरभरती होणे आणि विना अनुदानित शिक्षकांना अनुदान शक्य होणार आहे. ज्या चार-पाच राज्यांनी जुनी पेन्शन योजना लागू केली, त्यांचे २०३० नंतर काय होणार, हे एकदा अभ्यासायला हवे. केंद्र सरकार योजनांसाठी पैसे देते, पगारासाठी नाही, याचे भाने ठेवायला हवे. एकीकडे ही स्थिती असताना कांद्याला मातीमोल भाव, टोमॅटो फेकून देण्याची वेळ, शंभर किलो वांगी विकून हाती ६५ रुपये येणे, भाव नसल्याने कोबीच्या शेतीत नांगर घालणे अशा बातम्या मन विषण्ण करणाऱ्या आहेत. शेतीमालाच्या दरासाठी पुणतांब्यात शेतकऱ्यांनी संप केला, त्यातून हाती काहीच लागले नाही.


## PUBLIC NOTICE

This Notice is hereby given by my client to the public at large that my client is Co-owner of **Land situated at Panvel. Tal. Panvel, Dist. Raigad for Final Plot No.16/1, Area 2126.82 Sqmtrs out of 11070 Sqmtrs of total area.** within the limits of Panvel Municipal Corporation. the said final plot is allotted by as per Order of **Tribunal of Appeal, (Constituted under The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966), Town Planning Scheme Panvel No. 1 (First Variation) (Final) Appeal No. 39/1987. through The Hon'ble District Judge Shri R.S.Gaikaiwari (President) Raigad. at Alibag** on dated 19/12/2003 in favor of my client so my client give this public notice for not purchase. sale any residential unit shop in project name **Sai Aura Developed by M/s. Priya Construction.** upon the above said final plot by any person. if any person purchase sale any residential unit or shop in the said project they will solely liable for loss and damage because the said property is in litigation before Govt. Authority for cancellation of construction work (C.C).

Therefore any person(s) having any deal in respect of the above referred property **situated at Panvel, Tal. Panvel. Dist. Raigad for Final Plot No. 16/1, Area 2126.82 Sqmtrs out of 11070 Sqmtrs of total area,** or part thereof by way of sale. purchase. exchange. mortgage. charge. gift. maintenance. inheritance. possession, lease. tenancy. sub tenancy. lien. license. hypothecation. transfer of title or beneficial interest under any trust right of prescription or pre-emption or under any Agreement or other disposition or under any decree. order or Award or othenvise claiming. howsoever. are hereby given knowledge that they are approach to the **M/s. Priya Constructions** to cancel the said deal because my client is Co-owner of above said land. vide above said order of **Hon'ble District and Sessions Judge Raigad at Alibag on dt. 19/12/2003**. if any person deal like above they are sole responsible for their damage and loss because my client did not give his NOC for construct the said project upon the above said plot.

Place: Panvel
Date : 19/03/2023

**ADV. ARUN KUMAR**
**ADV. HIGH COURT**


# उरण प्रकल्पग्रस्तांची विविध मागण्यांसाठी सिडको विरोधात निदर्शने

**नवी मुंबई दि. १८ (वार्ताहर): उरण मधील प्रकल्पग्रस्तांनी आपल्या मागण्यासाठी सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन कार्यालयावर शुक्रवारी निदर्शने करुन सिडकोला एक इंचही जमिन देणार नसल्याचा इशारा दिला.**



सिडको बाधित जमिन व घरे बचाव कृती समितीचे अध्यक्ष कॉम्रेड भूषण पाटील, ९५ गाव नवी मुंबई नैना व इतर प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, अरविंद घरत, ॲड. रामचंद्र घरत, सुधाकर पाटील, हेमलता पाटील, काका पाटील आदीं प्रमुख नेत्यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या निदर्शनात शेकडो प्रकल्पग्रस्त सहभागी झाले होते. यावेळी प्रकल्पग्रस्तांच्या शिष्टमंडळाने सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलाश शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

सिडकोने १२ फेब्रुवारी २०२२ रोजी काढलेली चाणजे, केगाव व नागाव सह इतर गावातील भूसंपादनाची अधिसूचना रद्द करण्यात यावी. तसेच २५ ऑक्टोबर २०२२ मध्ये राज्य सरकारने काढलेल्या सिडको प्रकल्पग्रस्त घरांना नियमित करण्याच्या अध्यादेशात बदल करून प्रकल्पग्रस्तांची घरे(बांधकामे) त्यांच्या नावे कायमस्वरूपी करण्यात यावीत.

या दोन प्रमुख मागण्यांसह नैना प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी उरण येथील सिडको बाधित जमिन व घरे बचाव कृती समितीच्या वतीने सिडको कार्यालयावर निदर्शने करण्यात आली होती. यावेळी प्रकल्पस्तांनी सिडकोला एक इंचही जागा देणार नसल्याचा इशारा दिला.

प्रकल्पग्रस्तांच्या या मागण्या मान्य न झाल्यास येत्या काही दिवसांमध्ये सिडको बाधित जमिन व घरे बचाव कृती समिती, ९५ गाव नवी मुंबई नैना व इतर प्रकल्पग्रस्त समिती तसेच पनवेल उरण भागातील सर्व प्रकल्पग्रस्त समित्या एकत्र येऊन मंत्रालयावर लाँग मार्च काढण्याचा इशारा देखील देण्यात आला. यावेळी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलाश शिंदे यांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचे निवेदन शानाकडे पाठविणार असल्याचे शिष्टमंडळाला आश्वासन दिले.

# ई रिक्षाच्या समर्थनार्थ माथेरानमध्ये उसळला जनसागर

**मुकुंद रांजाणे दि. १८ (माथेरान) : पुरे झाली ही शिक्षा आम्हाला हवी ई रिक्षा, माथेरान आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, निर्धार पक्का आम्हाला हवी ही रिक्षा या घोषणांनी माथेरानचा संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.तीन महिन्यांच्या पायलेट प्रोजेक्ट नंतर ई रिक्षा बंद करण्यात आल्या आहेत.**



सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्देशामध्ये असा कुठेही उल्लेख केलेला नाही की पायलेट प्रोजेक्ट नंतर या रिक्षा बंद कराव्यात सुप्रीम कोर्टाने सनियंत्रण समितीकडे त्याबाबतचा अहवाल मागवला असून या ठिकाणी ई रिक्षा सेवा पूर्ववत सुरू करावी त्याचप्रमाणे धूळ विरहित रस्त्यांची कामे ताबडतोब करण्यात यावीत या मागणीसाठी ई रिक्षा आणि क्ले पेव्हर ब्लॉक रस्त्यांच्या समर्थनार्थ माथेरान मधील तमाम नागरिकांनी व्यापाऱ्यांनी माथेरान बंद करून ई रिक्षा समर्थनार्थ सकाळी अकरा वाजता आपला मोर्चा अधीक्षक कार्यालयावर नेला होता.अधीक्षक दीक्षांत देशपांडे आणि मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांना निवेदन देण्यात आले. भर उन्हात ई रिक्षा आणि क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांच्या समर्थनार्थ माथेरान मधील जनसागर मोठ्या प्रमाणात उसळला होता यावेळी ई रिक्षाचे कट्टर समर्थक असणारे काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना ह्या पक्षाचे प्रमुख नेते मोर्चात सक्रिय सहभागी झाले होते. या मोर्चात महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती त्याचप्रमाणे लहान लहान शालेय विद्यार्थी या मोर्चात सहभागी झाले होते.

ई रिक्षामुळे जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात पर्यटकांनी मोठया प्रमाणावर हजेरी लावली होती. परंतु सध्या या रिक्षा बंद असल्याने स्थानिकांना मंदीच्या झळा सोसाव्या लागत आहेत. मातीची धूप थांबविण्यासाठी क्ले पेव्हर रस्ते हाच उत्तम पर्याय सनियंत्रण समितीच्या माध्यमातून करण्यात आला होता परंतु ही कामे सुध्दा बंद करण्यात आली आहेत. या रस्त्यावरून सर्वांना चालणे सोयीस्कर होत आहे. मातीच्या प्रदूषणाचा त्रास सर्वाना होत असतो त्यामुळे आरोग्य आणि पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे त्यासाठी ही कामे लवकरच सुरू करावीत. मनोज खेडकर ---माजी नगराध्यक्ष. ई रिक्षामुळे आम्हाला खूपच फायदा झाला होता पण आता ही सेवा बंद केल्यामुळे आम्हाला पायपीट करावी लागत आहे. आम्ही थकून जात आहोत त्यामुळे अभ्यास करताना थकवा जाणवतो तरी लवकरच ई रिक्षा सुरू करावी. रुद्र सुतार --शालेय विद्यार्थी

# गुगल पे हॅक करून दोन लाखाची फसवणूक

पनवेल दि. १८ ( वार्ताहर ) : एका इसमाच्या मोबाईल वर अज्ञात इसमाने फोन करून त्यानंतर त्याचे गुगल पे हॅक करून त्याच्या बँकेतील बचत खात्यातून २ लाख ९ हजार ९९९ /- रुपये काढून घेऊन त्याची फसवणूक केल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहती मध्ये घडली आहे. दत्तात्रय शेडगे हे तळोजा औद्योगिक वसाहती मधील कंपनीत कामावर असताना त्यांना एका अज्ञात इसमाने फोन करून त्यानंतर त्याचे गुगल पे हॅक करून त्याच्या बँकेतील बचत खात्यातून २ लाख ९ हजार ९९९ रुपये काढून घेऊन त्याची फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षामध्ये सामाजिक कार्यकर्त्यांसह जेष्ठ नागरिकांचा प्रवेश



**पनवेल दि. १८(संजय कदम): शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख-रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली खारघर शहरातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांसह जेष्ठ नागरिकांनी भगवा ध्वज हाती घेत व शिव बंधन बांधून पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.**

खारघर वसाहतीमधील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांसह जेष्ठ नागरिक त्यामध्ये प्रामुख्याने प्रकाश भालेराव, सदाशिव मुरगुडे, ठक्कर, चतुर्वेदी, संदीप ठाकुर, यांच्या सह अनेकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला त्यांचे स्वागत शिवसेना जिल्हाप्रमुख-रायगड शिरीष घरत यांच्यासह महानगर समन्वयक दिपक घरत, उपमहानगर प्रमुख प्रकाश गायकवाड, उपमहानगर समन्वयक संजय शिंदे, खारघर शहर प्रमुख गुरुनाथ पाटील, कळंबोली शहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, उप शहर संघटक शंकर सोनुले, विभाग प्रमुख उत्तम मोर्बेकर, सचिन ठाकूर, अनिल तळवणेकर, विभाग संघटक संजय कानडे, उपविभाग प्रमुख परशुराम देवरुखकर, शाखा प्रमुख आनंद व्हावळ, प्रणीत ठाकुर, सुयोग ठाकुर संतोष कट्टीमणी आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिप्ला कंपनीतर्फे प्रकाश इंजिनिअरींग वर्क्स ठरला सुरक्षा ट्रॉफीचा मानकरी

**रसायनी दि. १८ (राकेश खराडे) : पाताळगंगा हद्दीच्या क्षेत्रातील सिप्ला कंपनी सुरक्षा सप्ताह २०२३ साजरा करण्यात आला. या सुरक्षा सप्ताहात कंपनीतील सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात.**



येथील असणाऱ्या कामगारांना सुरक्षिततेचे महत्व यावेळेस पटवून देण्यात येते. काम करत असताना कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये याची काळजी घेतली जाते. कंपनीत विविध कामे करणारे छोटे-मोठे उद्योजक यांनाही यावेळी सुरक्षिततेचे नियम सांगून पुरस्कार देण्यात येते. रसायनी येथील उद्योजक तथा ज्येष्ठ समाजसेवक प्रकाशशेठ गायकवाड यांच्या प्रकाश इंजिनिअरींग वर्क्स यांना सुरक्षा ऑफीसरद्वारे सेफ्टी अवॉर्ड ट्रॉफीने सन्मानित

# राजिप पाले शाळेत भरला आनंदबाजार



**उरण दि. १८ (दिनेश पवार) : उरण तालुक्यातील एक छोटी शाळा परंतु ही शाळा नेहमीच चर्चेत असते याच एक मेव कारण म्हणजे या शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर,उपशिक्षिका पुष्पलता म्हात्रे, ह्याची तळमळ सोबत शाळा व्यवस्थापन कमिटी च सहकार्य ,या पाले शाळेला गणिताचं गाव म्हणून चर्चा आहे.**

त्यात आज सर्वांच्या सहकार्याने मुलांना लहान वयात व्यवसायिक ज्ञान मिळावं आणि सहज आकडे मोड करता यावी यासाठी आनंदबाजाराचे आयोजन करण्यात आलं आहे यावेळी आवरे ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंच समाधान म्हात्रे, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन च्या उरण तालुका प्रमुख रणिता ठाकूर, शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर, पुष्पलता म्हात्रे, सारडे विकास मंचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे शाळेय व्यवस्थापन समिती सदस्य ग्रामस्थ महिला तसेच तरुण वर्ग मोठ्या संघेन उपस्थित होते या आठवडा बाजारात ज्या प्रमाणे आपल्या दैंनंदिन जिवनात जसा बाजार भरला जातो तसाच काहीसा देखावा आज पहायला मिळाला या बाजारात शेव पुरी, चिकन पुरी , चिकन भाकरी ,कपडे, लिंबू सरबत , वडा पाव ,इडली असे विवीध प्रकारचे दुकान विद्यार्थ्यांनी माडली होती ,यावेळी गावातील महिला तरुण ग्रामस्थ सर्वांनी या राजिप शाळा पाले च्या आठवडा बाजारात आपली खरेदी करून मुलांना शिक्षण सोबत आर्थिक व्यवहार कसा करता यावा यासाठी सर्वांनी मोलाचं सहकार्य दिले , या आनंद बाजारात ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर , पुष्पलता म्हात्रे यांनी आभार मानले .

# अलिबाग नगरपालिका कचरा डेपोसंदर्भात लवकरच बैठक - मंत्री उदय सामंत

**मुंबई, दि. १८ : अलिबाग नगरपालिकेच्या हद्दीत निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्यासोबत अधिवेशन संपल्यानंतर बैठक घेण्यात येईल.**

हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी निश्चितपणे जागा उपलब्ध करून तोडगा काढण्याचा प्रयत्न करू, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. विधानपरिषदेत सदस्य अनिकेत तटकरे यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. मंत्री श्री. सामंत म्हणाले की, अलिबाग नगरपालिका हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी निविदा काढून वार्षिक कंत्राट देण्यात आले आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. तसेच आगामी काळातील नियोजनासाठी कृती आराखडाही तयार करण्यात आला आहे.

नगरपालिका हद्दीतील कचरा डेपोच्या ठिकाणी आसपासच्या ग्रामपंचायत हद्दीतून कचरा टाकण्यात येतो. त्याठिकाणी आग लागण्याची घटना घडली होती. याप्रकरणी पोलीस तक्रार करण्यात आल्याची माहिती मंत्री श्री. सामंत यांनी दिली. त्यामुळे याप्रकरणी नगरपालिका, संबंधित ग्रामपंचायत यांच्या प्रतिनिधींसह बैठक घेण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली. या चर्चेत सदस्य जयंत पाटील यांनी सहभाग घेतला.


## जाहीर नोटीस

अर्जदारातर्फे वकील
ॲड. अरबीना शेख

**पनवेल येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात**

फौ.पो.अर्ज क्र.२१९/२०२३ नि.क्र. पुढील दिनांक २१ एप्रिल २०२३

**अयाज फकीर मोहम्मद शेख** ...अर्जदार
**विरुध्द**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल** ...सामनेवाला

ज्या अर्थी सदरचे अर्जदार यांचे आजोबा कै. अब्दुल मिया शेख हे २२ डिसेंबर, १९६९ ला राहत्या घरी मौजे धानसर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे मयत झाले आहेत. परंतु काही कारणास्तव अनवधानाने सदरचे अर्जदार यांचेकडून मृत्यूची नोंद पनवेल यांचे जन्म मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये करणेची अनवधानाने राहून गेली आहे. सबब सदर अर्जदार यांनी मे. न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज मृत्यूची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केलेला आहे.

सबब, सदर अर्जाच्या कामी कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून वर नमूद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत. वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे न्यायालयाकडून सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल.

सदरची नोटीस आज दिनांक १७ मार्च २०२३ ला आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क. लिपिक**
**फौ. न्याया. पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा. अधीक्षक,**
**फौ. न्याया. पनवेल**


# महिलेची गंठण खेचून दोघे पसार

**पनवेल दि. १८ ( संजय कदम ) : बस स्टॉप वर रिक्षाची वाट पहात उभ्या असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील ६ तोळे वजनाची सोन्याची गंठण खेचून दोघे जण बुलेट मोटार सायकलीवरून पसार झाल्याची घटना पनवेल जवळील नावडे गाव बस स्टॉप येथे घडली आहे.**

मीरा घरत ( वय ५७ ) या बस स्टॉप वर रिक्षाची वाट पहात उभ्या असताना काळ्या रंगाच्या बुलेट वरून आलेल्या मोटार सायकलींवरील मागे बसलेल्याने त्यांच्या गळ्यातील ८० हजार रुपये किमतीची सोन्याची गंठण खेचून ते पसार झाल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

# होन्डा सिटी गाडीची चोरी

**पनवेल दि. १८(संजय कदम): पनवेल तालुक्यातील एसबी गॅरेज समोर कोळखे गाव येथे उभी करून ठेवलेली होन्डा सिटी गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.**

किशन मलगी वय ( ६० ) यांनी ५ लाख २० हजार किमतीची सफेद रंगाची होन्डा सिटी गाडी क्रमांक एमएच ४६ एपी ३०७० ही सर्व्हिसींग साठी दिली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे

# भारतीय मजदूर संघाची जे. एन. पी. ए. प्रशासन भवना समोर निदर्शने



**उरण दि. १८ ( दिनेश पवार ): केंद्र सरकार व जे. एन. पी. ए. व्यवस्थापनाच्या कामगार विरोधी धोरणांविरोधात भारतीय मजदूर संघ व जेएनपीटी जनरल कामगार संघटनेने जे. एम. पी. ए. प्रशासन भवना समोर शुक्रवार( दि. १७) मार्च रोजी उग्र निदर्शने केली. केंद्राने जे. एन.पी.ए. हॉस्पीटलचे खाजगीकरण रद्द करावे, कंत्राटी कामगारांना ग्रॅच्युईटी व आरोग्य विमा द्यावा, कामगाराचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, निवृत्त कामगाराच्या वारसांना नोकरी मिळवून द्यावी तसेच वेतन कराराची थकबाकी ताबडतोब देण्यात यावी, या व इतर मागण्यांसंदर्शन हि निदर्शने करण्यात आली.**

जे.एन.पी.ए. सुशोभिकरणाच्या नावाखाली करोडो रुपये खर्च करीत आहे. परंतु त्याची निगा राखणाऱ्या कंत्राटी कामगारांना वेतन करार होऊन ८ महिने झाल्यावर सुद्धा ३२ महिन्यांची थकबाकी देण्यासाठी फाईलवर सही होत नाही, अधिकाऱ्यांच्या हाताला लकवा मारलाय का ? असा सवाल कामगार भारतीय पोर्ट डॉक मजदूर महासंघाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांसह उपस्थित केला.

हजारो कोटींची रॉयल्टी जमा होते, परंतु थकबाकी देण्यास टाळाटाळ करून निव्वळ मुजोरपणा सुरू असल्याचा आरोप देखील त्यांनी करीत हा माज कसा उतरवायचा याची आम्हाला चांगली जाण आहे, हा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला. शिष्टमंडळाने जे.एन. पी. ए. चे मुख्य व्यवस्थापक जयंत ढवळे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले व चर्चा केली. यावेळी श्री. ढवळे यांनी वेतन कराराची रक्कम येत्या १५ दिवसाच्या आत देण्याचे मान्य केले. यावेळी भारतीय पोर्ट अँण्ड डॉक मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पावल, जे.एन.पी. ए. कामगार विश्वस्त रवींद्र पाटील, जनार्दन बेडा, एल. जी. म्हाले यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. यावेळी प्राधिकारी अध्यक्ष प्रमोद पाटील, मंगेश ठाकूर, श्री ठाकरे व इतर पदाधिकारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्वेलर्स दुकान मालकावर चाकू हल्ला करुन दागिने घेऊन पळून जाणाऱ्या लुटारुला नागरिकांनी बेदम चोपले

**पनवेल दि. १८ (वार्ताहर) : दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने खांदा कॉलनीतील विजय श्री ज्वेलर्स दुकानात जाऊन मुकेश जैन (४७) या सोनारावर चाकू हल्ला करुन लाखो रुपये किंमतीचे दागिने घेऊन पळुन जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या सुखविंदर जसबिरसिंग धामी (३२) या लुटारुला नागरिकांनी पकडुन बेदम चोप दिल्यानंतर त्याला पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना खांदा कॉलनी सेक्टर- ६ मागात घडली. या घटनेत लुटारुच्या हल्लूयात सोनार गंभीर जखमी झाला आहे. तर नागरिकांच्या मारहाणीत लुटारु जखमी झाला आहे. या दोघांवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत.**

या घटनेतील जखमी मुकेश जैन यांचे खांदा कॉलनी सेक्टर- ८ मध्ये विजय श्री नावाचे ज्वेलर्स दुकान आहे. गत बुधवारी रात्री आरोपी सुखविंदर धामी हा जैन यांच्या दुकानात दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने गेला होता. यावेळी त्याने सोन्याच्या तीन चैन पसंत केल्यानंतर सदर दागिने घेऊन पळुन जाण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यामुळे सोनार मुकेश जैन यांनी त्याला अडवल्यानंतर त्याने जैन यांच्या पाठीवर तसेच कानाजवळ चाकुने हल्ला केला. त्यानंतर तो सोन्याच्या तीन चैन घेऊन पळुन जात असताना, मुकेश जैन यांनी आरडा-ओरड केली. त्यामुळे त्या भागातील नागरिकांनी आरोपी सुखविंदर धामी याला पकडुन बेदम मारहाण केली. त्यांनतर त्याला खांदेश्वर पोलिसांच्या स्वाधीन केले.

या घटनेत लुटारुच्या हल्लूयात सोनार मुकेश जैन जखमी झाल्याने त्यांना खारघर मधील मेडीकेअर हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. तर नागरिकांच्या मारहाणीत जखमी झालेल्या सुखविंदर धामी याला पनवेल मधील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर खांदेश्वर पोलिसांनी सुखविंदर धामी याच्या विरोधात जबरी लुट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तसेच दागिने घेऊन पळुन जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या सुखविंदर धामी याला मारहाण करणाऱ्या १० ते १५ नागरिकांविरोधात देखील मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे। या प्रकरणातील सुखविंदर धामी याच्यावर अद्याप रुग्णालयात उपचार सुरु असल्याने त्याला अद्याप अटक करण्यात आली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

या घटनेतील आरोपी सुखविंदर धामी हा कळंबोली येथे राहण्यास असून तो डी. जे. ऑपरेटरचे काम करतो. चार वर्षापुर्वी त्याचा प्रेम विवाह झाला होता. त्यावेळी त्याने आपल्या नातेवाईकांकडुन चार लाख रुपये व्याजाने घेतले होते. तसेच मित्रांकडुन ८० हजार रुपये उसने घेतले होते! या कर्जदारांकडुन त्याच्याकडे वारंवार पैशांची मागणी करण्यात येत होती.

मात्र सुखविंदर याला कर्जाने घेतलेले उसने पैसे परत करता येत नव्हते. त्यातच त्याला कामधंदा नसल्यमुळे तो तणावाखाली आला होता. त्यामुळे एखाद्या ज्वेलर्सच्या दुकानात सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने जाऊन । तेथील सोन्याचे दागिने घेऊन पळुन जण्याची कल्पना त्याच्या डोक्यात आल्यानंतर त्याने हा प्रकार केल्याचे पोलिसांना दिलेल्या जबाबात स्पष्ट केले आहे.

# मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते शेखरदादा चषक रजनी क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन



**उरण दि १८ (विठ्ठल ममताबादे ) : श्री वरद विनायक मित्र मंडळ बोकरविडा आयोजित शेखरदादा चषक-२०२३ रजनी क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते झाला.**

सदर प्रकाश झोतातील रजनी क्रिकेट स्पर्धा १६ मार्च ते १९ मार्च २०२३ या कालावधीत बोकरविरा पेट्रोल पंप जवळील मैदानात खेळविल्या जाणार आहेत, या रजनी क्रिकेट स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या माजी आमदार मनोहरशेठ भोईर व प्रमुख मान्यवरांचा स्पर्धेचे आयोजक शेखर पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, तसेच जिल्हास्तरीय महिला कब्बडी संघात निवड झालेल्या कु प्रांजली भारत पाटील ह्या मुलीचा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

# वडगावमध्ये पाणी अडवा-पाणी जिरवा उपक्रमाचे भूमिपूजन, तीन करोड लिटर पाण्याची होणार साठवण

**रसायनी दि. १८ (राकेश खराडे ) : नोव्होझाईम्स साऊथ एशिआ प्रायव्हेट लिमिटेड आणि अनार्डे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वडगाव ग्रामपंचायत हद्दीतील वडगाव गावाजवळच्या पाण्याच्या ओहोळावर पाटबंधारा आणि रिचार्ज शाफ्ट बांधून पाणी अडवा, पाणी जिरवा या उपक्रमाचे भूमिपूजन कंपनीचे संस्थापक संजय सूर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ बप्पाजी खेडकर,सरपंच गौरी गडगे यांच्या हस्ते करण्यात आले**



यावेळी कार्यक्रम सूरु होण्याअगोदर रसायनी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ बप्पाजी खेडकर यांनी पाटबंधारे बांधून शेतकऱ्यांना लाभणाऱ्या फायदयांची माहिती दिली.तर अनार्डे फाउंडेशनचे पाणीपुरवठा विभागप्रमुख प्रसाद अंधेरे यांच्या म्हणण्यानुसार वडगाव ओहोळावर 'पाणी अडवा पाणी जिरवा'उपक्रमातंर्गत तीन करोड लिटर पाणी साठवणार असून आसपासच्या विहिरींची पाणीपातळी ही वाढणार आहे.भविष्यात आसपासच्या शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना याचा फायदा होईल.यानंतर पाणी अडवा पाणी जिरवा या उपक्रमाचे उदघाटन मान्यवरांच्याहस्ते झाल्यानंतर वडगांव ग्रामपंचायतीच्या सरपंच गौरी महादेव गडगे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर व नोव्होझाइम्स कंपनीचे बारा संचालक संजय सूरसहित मनेजमेंट टिमचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.अनार्डे फाउंडेशन व नोव्होझाईम्स कंपनीने हाती घेतलेल्या कार्यक्रमाच्या वडगांव ग्रामपंचायतीच्या सरपंच गौरी गडगे यांनी नोव्हेझाईम्स कंपनीने पूर्ण केलेल्या, बोरिवली, धनगरवाडी, ठाकुरवाडी व साईनगर गावांमध्ये पूर्ण केलेल्या 'वाटरशेड मॅनेजमेंट व घरादारांस पाणी वितरिकरण या उपक्रमांबद्दल आभार सरपंच गौरी महादेव गडगे यांनी आभार मानले.

सदर कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी नोव्होझाईम्स कंपनीचे संचालक संजय सूर व मॅनेजमेंट टिममधून सतिश सर्वोदय, संतोष राणे,वसंत ओक तसेच अनार्डे फाऊंडेशनचे प्रसाद अंधेरे,सुशांत,प्रताप आदीसह शेतकरी भारत जांभुळकर, शंकर फोफाडे, हनुमंत पाटील, रामदास जाधव, चंद्रकला आदी उपस्थित होते.

# दि. २३ रोजी पनवेल मध्ये श्री स्वामी समर्थ प्रगट दीन सोहळा



**पनवेल दि. १८ ( संजय कदम ) : दरवर्षी प्रमाणे यंदाही पनवेल शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठ ( मंदिर ) येथे प. पु. सद्गुरू नाना महाराज परांजपे यांच्या कृपाशीर्वादाने श्री स्वामी समर्थ प्रगट दीन सोहळा साजरा केला जाणार आहे**

गुरुवार दि २३/०३/२०२३ रोजी शहरातील गावदेवी पाडा येथील श्री. स्वामी समर्थ मठ ( मंदिर ) येथे सकाळी ५.०० श्री स्वामी समर्थ महाराज ची काकड आरती. सकाळी ७.३० नित्य नैमत्तिक पूजा, लघु रूद्र, गुरू पाद्यपूजन आणि आरती, स्वामी प्रगट दीन आध्यय वाचन, स्वामी प्रगट दीन सोहळा, श्री दत्त गायत्री होम, श्री स्वामी समर्थ महिला मंडळ चे भजन, श्री गुरुवर्य मठाधिपती श्री सुधाकर भाऊ यांचे प्रवचन, महाआरती व महाप्रसादाचे आयोजन आगरी समाज हॉल येथे करण्यात आले आहे . तसेच रात्री १० पासून भजन सोहळा संपन्न होणार आहे . तरी स्वामी भक्तांनी या सोहळ्यास उपस्थिती ठेवावी असे आवाहन कु . अवधूत सुधाकर घरत यांनी केले आहे .

# मदर्स टच, प्ले ग्रुप आणि नर्सरी स्कूल चा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न



**पनवेल दि. १८ (मिलिंद खारपाटील) : मदर्स टच, प्ले ग्रुप आणि नर्सरी स्कुल चा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा नवीन पनवेल मधील सेक्टर २ मधील कर्नाटक हॉल मध्ये शुक्रवार दि १८ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**

या स्नेहसंमेलनाला शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ पुष्पा तिवारी, भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र राज्य उत्तरप्रदेश सेल च्या महिला सचिव ॲड बिंदू दुबे, महामुंबई चे संपादक मिलिंद खारपाटील, पंतजली योगा चे आर पी यादव, पनवेल गुरुद्वारा चे कुलभीर सिंग, योग शिक्षिका डॉ स्वरांजली गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या प्रेमा भोपी, भारती मिश्रा, अर्चना मुझुमदार यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि श्रीगणेश मूर्तीस पुष्पहार अर्पण करून झाली . या नंतर विद्यार्थ्यांनी ये तो सच है की भगवान है, ऐसा देश है मेरा, वक्रतुंड महाकाय, लुंगी डान्स, विठू माऊली,भिगी भिगी रातो मे, रामजी की कृपा से आदी गाण्यांवर सुंदर नृत्य केले. धार्मिक, देशभक्ती याचबरोबर सध्या आवश्यक असलेल्या प्लॅस्टिक मुक्तीचा संदेश गाण्याबरोबर देण्यात आला.

ॲड बिंदू दुबे म्हणाल्या की मुले ही देशाचे भविष्य आहेत.आणि या शाळेत मुलांना अतिशय चांगले शिक्षण आणि संस्कार देण्याचे काम शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पा तिवारी आणि त्यांच्या सहकारी करत आहेत हे निश्चितच अभिनंदनीय आहे.

डॉ स्वरांजली गायकवाड म्हणाल्या की जीवनात योगाचे महत्व अनन्यसाधारण आहे. याचबरोबर योग्य आहार घेणे देखील अत्यावश्यक आहे. महिला पालकांनी वेगवेगळे ड्रेस परिधान करून फॅशन शो च्या माध्यमातून देशाची विविधता दर्शविली.

उपस्थित मान्यवरांना २४ तास ऑक्सिजन देणारे तुळशीचे रोपटे देऊन त्या माध्यमातून पर्यावरणाचा संदेश देण्यात आला.सायंकाळी ६ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम रात्री १० वाजेपर्यंत रंगला. शाळेतील शिक्षिका गौरी सातपुते, मनिषा जगताप, रेणू घावर , विद्यार्थी आणि पालक यांच्या सहकार्याने हे स्नेहसंमेलन यशस्वी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यपिका डॉ पुष्पा तिवारी यांनी ओघवत्या शैलीत अप्रतिम केले.राष्ट्रीताने कार्यक्रमाची सांगता झाली

# न्हावाशेवा वपोनि पदी संजीव धुमाळ

**उरण दि १८(विठ्ठल ममताबादे ) : उरण तालुक्यात अतिशय महत्वाच्या शासकीय अधिकाऱ्यांचे बदल्यांचे सत्र सुरूच असून नवीन येणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांकडून उरणच्या समस्यांना न्याय मिळेल का ? असा सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे.अधिकारी येतात जातात मात्र उरणच्या समस्या आहे तशाच राहतात. आज उरण मध्ये अनेक समस्या आहेत मात्र त्या सुटत नसल्याने जनतेत प्रचंड नाराजी सुद्धा आहे. मात्र नवीन येणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांकडून जनतेच्या खूप अपेक्षा असतात मात्र हे अपेक्षा कधीच पूर्ण होत नसल्याने उरण मध्ये येणाऱ्या नवीन शासकीय अधिकाऱ्यां बाबत नागरिकांमध्ये उत्सुकता बघायला मिळत नाही.**

नवीन येणाऱ्या अधिकाऱ्यांकडे बघण्याचा दृष्टीकोन नागरिकांचा बदलत चालला आहे. लाखो करोडो रुपये देऊन शासकीय अधिकारी उरण मध्ये येतात. उरण मध्ये जॉईन होण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांना वरच्या लेव्हलला लाखो रुपये मोजावे लागतात. आणि हे अधिकारी लाखो रुपये देऊन उरण मध्ये येतात. व ते त्यांच्या कामातच व्यस्त असतात.

अशी चर्चा उरण मध्ये सर्वत्र सुरु आहे.जनतेच्या प्रश्नांकडे या नवीन शासकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होताना दिसून येते.त्यामुळे नवीन येणारे अधिकारी उरणचे प्रश्न सोडवतील का असा सवाल जनतेने उपस्थित केला आहे. उरण तालुक्यातील न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी संजीव धुमाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच पदभारही स्वीकारला आहे.

उरणमधील शासकीय अधिकाऱ्यांचे बदली सत्र सुरू आहे. त्यामध्ये उरण पोलीस ठाण्याचे वपोनि सुनील पाटील, न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वपोनि मधुकर भटे यानंतर उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांचीही उरणहून बदली झाली आहे. अशा प्रकारे काही दिवसांच्या अंतराने प्रथमच तीन अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्याचे बोलले जात आहे. न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांची बदली झाल्याने त्या जागी संजीव धुमाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# महिला दिनानिमित्त ब्रह्मा कुमारी डॉ. शुभदा नील यांचे रजोनिवृत्ती व मेडिटेशन बद्दल मार्गदर्शन



**पनवेल दि. १८ (प्रतिनिधी) : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ब्रह्मा कुमारी डॉ. शुभदा नील यांनी महिलांना रजोनिवृत्ती व मेडिटेशन बद्दल सिडको गार्डन सेक्टर १० येथे मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी त्यांचा नगरसेविका राजश्री वावेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

यावेळी महिलांची हिमोग्लोबिन व डायबेटिस साठी मोफत रक्त तपासणी करण्यात आली.या कार्यक्रमाला नगरसेविका वृषाली वाघमारे, अनिता भोर व त्यांच्या मंडळाच्या सहकारी भगिनी उपस्थित होत्या.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, श्री. विनोद किसन पाटील, रा.घोटगाव, ता.पनवेल, जि.रायगड यांचे विक्रम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१, शॉप नं.०९, सेक्टर १०, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड या गाळ्याचे ओरिजनल पेपर पावती नं.१२५४ दि.०८/०२/२०१३, पवल ४-१२४३/२०१३ दि.०८/०२/२०१३ असे घोटगाव ते पनवेल असा दि.१५/०३/२०२३ रोजी रिक्षाने प्रवास करीत असताना कुठेतरी पडून गहाळ झाले असून त्या संदर्भात तळोजा पोलीस ठाणे मध्ये हरविलेल्या मालमत्तेच्या नं.०२२९/२०२३ दि.१८/०३/२०२३ अन्वये नोंद केलेली आहे.

तरी वरील गाळ्याचे ओरिजनल कागदपत्रे कोणाला आढळल्यास खालील नमूद पत्यावर किंवा मोबाईल नंबर अथवा तळोजा पोलीस ठाणे येथे १५ दिवसात आणून द्यावीत.

स्थळ : पनवेल

दिनांक : १९/०३/२०२३ सही/-

**विनोद किसन पाटील**

रा.घोटगाव, ता.पनवेल, जि.रायगड

मो.नं.९८३३३०९९९९

श्री. गुन्नाल साहेब कोर्ट

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयांत**

**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३९८/२०२३ नि.क्र. ७/ड ने.ता. ०३/०५/२०२३**

१) **श्री. माधव विष्णु पाटणकर**
वय - ८० वर्षे, धंदा- शेती,

२) **श्री. मंदार माधव पाटणकर**
वय - ५० वर्षे, धंदा- नोकरी
१ व २ रा. सोहम अपार्टमेंट,
बी विंग, १ला मजला, रुम नं. ४,
महात्मा फुले मार्ग, जनकल्याण बँकच्या मागे,
ता. पनवेल, जि. रायगड - ४१० २०६

३) **सौ. मीरा मोहन देवधर**
वय - ५२ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. ए-७, हरीप्रसाद अपार्टमेंट,
एस. नं. २४/४/१, सिंहगड रोड,
एच. डी. एफ. सी. बँक जवळ,
विठ्ठलवाडी, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१.

**अर्जदार**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै. मनिषा माधव पाटणकर** यांचे निधन दिनांक ०८/०४/२०१९ रोजी झाले. **श्री. माधव विष्णु पाटणकर वगैरे** यांनी **कै. मनिषा माधव पाटणकर** यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**कै. मनिषा माधव पाटणकर** यांचे मालकीची ता. पनवेल, जि. रायगड यांचे हद्दीतील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील सोहम अपार्टमेंट को. ऑप. हौ. सौ. बी विंग, १ ला मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ४ (जुना सदनिका क्र. ८), सि. टी. एस. नं. ६६६ व इतर, महात्मा फुले रोड, जनकल्याण बँकेच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड क्षेत्र ५३०.०० चौ. मीटर अशा वर्णनाची निवासी सदनिका.**

**कै. मनिषा माधव पाटणकर** यांचे मृत्युपश्चात अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १८/०३/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

क. लिपिक
दिवाणी न्यायालय
व. स्तर, पनवेल,

कोर्टाचा शिक्का

सहाय्यक अधिक्षक
दि. न्या.व. स्तर, पनवेल,

# पीक संरक्षण घरच्या घरी : उपयोगी आहे निंबोळी अर्क

**रसायनांच्या अतिवापरामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास सुध्दा निश्चितपणे थांबविता येऊ शकतो. त्यासाठी एकात्मिक किडरोग पध्दतीमधील शिफारसीचा अवलंब सर्वांनी करावा. त्या पध्दतीमधील अत्यंत महत्वाचा व तितकाच प्रभावी उपाय म्हणजे निंबोळी अर्क. काय आहे निंबोळी अर्क तयार करण्याची पध्दत, त्याचे लाभ समजून घेवू, या लेखाद्वारे..!**

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

**निंबोळी अर्क तयार करण्याची पध्दत :-** शेतीच्या बांधावरील, रस्त्याच्या कडेला असलेल्या कडुनिंबाच्या झाडाखाली पडलेल्या चांगल्या पिकलेल्या निंबोळ्या वेचून गोळा करा. गोळा केलेल्या निबोळ्यांची साल वेगळी करून बियांचा गर स्वच्छ धुवून काढा. गरात साखरेचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यावर बुरशी वाढण्याची शक्यता असते. साल व गर काढलेल्या निंबोळीच्या बिया चांगल्या सुकवून कोरड्या जागी साठवून ठेवा. चांगल्या सुकलेल्या निंबोळ्यांच्या बिया घेऊन त्या खलबत्यात कुटून चांगल्या बारीक करून घ्या. प्रमाणात निंबोळ्या गोळा झाल्या असल्यास पल्चरायझरच्या सहाय्यानेसुध्दा पावडर करता येईल. फवारणीच्या आदल्या दिवशी सायंकाळी पाच किलो बारीक केलेली निंबोळी पावडर नऊ लिटर भिजत टाका. तसेच एक लिटर पाण्यात २०० ग्राम साबणाचा चुरा वेगळा भिजत टाका. दुसऱ्या दिवशी सकाळी भिजत टाकलेल्या निंबोळीच्या अर्क स्वच्छ कपड्यातून चांगला गाळून या अर्कात १ लिटर पाण्यात तयार केलेले साबणाचे द्रावण मिसळा. हा अर्क १० लिटर होईल एवढे पाणी टाका. एका टाकीमध्ये ९० लिटर पाणी घ्या व वरील १० लिटर चे द्रावण त्यामध्ये मिक्स करून घ्या आणि ढवळा. अशा प्रकारे ५% निंबोळी अर्क तयार झाला आहे. ५% निंबोळी अर्क ५००-१००० मि.ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. निंबोळी अर्क फवारणीच्या दिवशीच तयार करून वापरावे. मावा, अमेरिकन बोंडअळ्या, तुडतुडे, पाने पोखरणारी व देठ कुरतडणारी अळी, फळमाशा, खोडकीडा अनेक किडींवर याचा प्रभाव पडतो तसेच फवारणीमुळे रसशोषक किडींचा प्राभाव कमी होतो.

पिकातील किडींच्या नियंत्रणासाठी महागडी रासायनिक किटकनाशके किंवा ज्याच्या गुणवत्तेबाबत फारशी खात्री देता येणार नाही, अशी सेंद्रीय उत्पादने बाजारातून खरेदी करण्यापेक्षा निसर्गत: उपलब्ध असलेल्या निंबोळीच्या वापरामुळे अगदी अल्प खर्चात घरच्याघरी प्रभावी नैसर्गिक किटकनाशक तयार होते. याचा प्रत्येक शेतकऱ्यांनी वापर करावा आणि रसायनांमुळे होणारे दुष्परिणाम टाळण्याबरोबरच उत्पादन खर्चात सुध्दा काटकसर करून आपला निव्वळ नफा वाढवावा, असे आवाहन जिल्ह्यातील समस्त शेतकरी बंधू-भगिनींना करण्यात येत आहे. तसेच अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी सहायक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

# राज्य पॉवरलिफ्टींग स्पर्धेत रायगडचे सुयश



**पनवेल दि. १८ : महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टींग असोसिएशन यांचे वतीने राज्य पॉवरलिफ्टींग सब ज्युनिअर,ज्युनिअर, सीनिअर, मास्टर(४०, ५०, ६०वर्षावरील) अशा विविध पुरुष आणि महिलांअए स्पर्धा नुकतीच पुणे येथे पार पडली. सदर स्पर्धा समृध्दी लॉन्सन्हरे-धायरी येथे झाली.** या स्पर्धेचे आयोजन पुण्याच्या आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रुतिका राऊत,नीता मेहता आणि मयानी कांबळे या तिघींनी मिळून केले होते.या स्पर्धा आयोजनासाठी महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टींग असोसिएशन चे जनरल सेक्रेटरी,शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी ३सुवर्ण,६ रौप्य आणि ३कांस्य पदक्म जिंकून आपला ठसा उमटविला आहे.पदक प्राप्त खेळाडू पुढील प्रमाणे आहेत.

**सुवर्ण पदक विजेते :** महेश पाटील.(मास्टर गट) अथर्व लोधी(सब ज्युनिअर)कुणाल पिंगळे((ज्युनिअर)
**रौप्यपदक प्राप्त खेळाडू :** संतोष गावडे ,दिनेश पवार,सौ. मयुरा अंगत(मास्टर गट)सुहानी गावडे(सब ज्युनिअर गट)हृतिक पोळ (ज्युनिअर गट), शुभम कांगले(सीनिअर गट)
**कांस्य पदक प्राप्त खेळाडू :** दिव्या महाडिक, संस्कार सरदार,सम्यक गायकवाड यासर्व खेळाडूंचे पॉवरलिफ्टींग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या सर्व पदाधिकारी यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# एटीएम मशीनमध्ये छेडछाड करून दहा हजार रुपये काढले

पनवेल दि.१८ (वार्ताहर) : कामोठे परिसरातील एटीएम मशीनमध्ये छेडछाड करून त्यामधून दहा हजार रुपयांची रोख रक्कम काढून नेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामोठे सेक्टर ३६ येथील आंबे श्रद्धा सोसायटी येथे असणाऱ्या शरद सहकारी बँक लिमिटेड एटीएम सेंटरमध्ये एका अनोळखी इसमाने प्रवेश केला व आतमधील मशीनमध्ये चावीच्या सहाय्याने उघडून त्यामधून दहा हजार रुपयांची रोख रक्कम काढून नेली. याप्रकरणी शरद सहकारी बँकचे शाखा व्यवस्थापक रोहिदास डुकरे यांनी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात तक्रार दाखल केली आहे.

# तळोजा भागात बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेले ३ नायजेरीयन अटकेत

पनवेल दि. १८ (वार्ताहर) : तळोजा भागात बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या तीन नायजेरियन नागरिकांना तळोजा पोलिसांनी अटक केली आहे. इमेनेकि बॉन्नीफेस (४५), अमेची अजरेरे (४६) व मिका ग्रेस (४५) अशी या तिघांची नावे असून या तिघांकडे पासपोर्ट आणि व्हिजा नसल्याचे त्यांच्या चौकशीत आढळुन आले आहे. विशेष म्हणजे यातील एका नायजेरीयन नागरिकाला मुंब्रा पोलिसांनी गत वर्षी अंमली पदार्थाच्या तस्करीत अटक करुन त्याचा पासपोर्ट जप्त केल्याचे चौकशीत आढळुन आले आहे.

# अशोक सोनवणे यांचे दु:खद निधन



**रसायनी दि. १८ (राकेश खराडे) : तुराडे येथील डिंपल ड्रूम्स कंपनीचे कर्मचारी अशोक आनंदा सोनवणे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी ते ५७ वर्षाचे होते.**

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन,अविवाहित मुले असा परिवार आहे. अशोक सोनवणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते होते. ते विविध धार्मिक सामाजिक संघटनेमध्ये अत्यंत सक्रिय होते. त्यांच्या दुःखद निधनाचे वृत्त समजताच परिसरातील सर्व स्तरातील समाज बांधवांवर आणि रिक्षा चालक-मालक संघटना यांच्यावर तीव्र शोककळा पसरली आहे.अशोक सोनवणे यांचा शांत व मनमिळावू स्वभावामुळे ते सर्वांना परिचित होते. त्यांचे परिसरातील पत्रकारांसोबत सलोख्याचे संबंध होते.अशोक सोनवणे यांच्यावर शनिवार दि.१८ मार्च रोजी सायंकाळी शवविच्छेदन करण्यात आले.रविवार दि.१९ मार्च २०२३रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या शिवनगर येथील राहत्या घरापासून अंत्यविधीला सुरुवात होणार आहे आणि त्यांचा अंत्यविधी रिस येथील स्मशानभूमीत होणार आहे.

**नियमीत वाचा दैनिक किल्ले रायगड**

# उरण-पनवेल मार्ग सोमवारपासून दुरुस्तीसाठी बंद

उरण दि १८(विठ्ठल ममताबादे ) : उरण पनवेल हा रस्ता प्रवाशाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असून दररोज हजारो प्रवाशी या मार्गांवरून प्रवास करतात. मात्र उरण येथील उरण-पनवेल मार्गावरील दोन साकवच्या दुरुस्तीसाठी सोमवार (२० मार्च) पासून हा मार्ग प्रवासी वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या संदर्भात सूचना फलक बसविले आहेत. त्यानुसार उरण - पनवेल मार्गावरील उरण रेल्वे स्थानक व आनंदी हॉटेलजवळील दोन साकव (मोऱ्या) नादुरुस्त झाल्या आहेत. त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात येणार आहे. या कामासाठी सोमवार (२० मार्च) पासून उरण-पनवेल मार्गावरील बोकडवीरा पोलीस चौकी ते उरण कोटनाका (राघोबा मंदिर ) हा मार्ग वाहनांसाठी बंद करण्यात येणार आहे.प्रवाशी वर्गांचे प्रवासात होणारे हाल, जनतेच्या मागणीचा विचार करून व भविष्यातील होणारे अपघात टाळण्यासाठी पूल दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्याचे समजते.

**-:पर्यायी मार्ग :-**

उरण पनवेल हा महत्वाचा मार्ग वाहतुकींसाठी बंद केल्याने उरण शहरात व शहरातून ये-जा करण्यासाठी नागरिकांनी नवीन शेवा-उरण चारफाटा मार्गाचा पर्यायी मार्ग म्हणून वापर करण्याची सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे.

पान १ वरुन पुढे चालू

# नोकरी, व्यवसाय व रेल्वे स्थानकाच्या नामकरणासाठी सिडको व रेल्वे प्रशासन कार्यालयावर २३ मार्चला मोर्चा

हुतात्म्यांच्या बलिदानानी पावन झालेल्या धुतूम गावातील मौजे शेमटीखार येथे सिडको आणि रेल्वे प्रशासन रेल्वे स्थानक उभारत आहे.त्या रेल्वे स्थानकाला धुतूम रेल्वे स्थानक असे नाव देण्यात यावे यासाठी वारंवार सिडको आणि रेल्वे प्रशासनाकडे मागणी केली आहे.

परंतु सिडको आणि रेल्वे प्रशासनाने धुतूम रेल्वे स्थानक असे नाव न देता रांजणपाडा रेल्वे स्थानक नाव देऊन धुतूम गावातील हुतात्म्यांच्या बलिदानाची थट्टा करुन धुतूम गावाचे नाव पुसण्याचा प्रयत्न केला आहे.हे धुतूम गावातील ग्रामस्थ कदापी सहन करणार नाही.असा निर्धार सर्वानुमते धुतूम ग्रामसभेत व्यक्त करण्यात आला असून रांजणपाडा रेल्वे स्थानकाचे नाव दुरुस्त करून धुतूम रेल्वे स्थानक असे नामकरण करण्यात यावे, तसेच सदर रेल्वे स्थानकात धुतूम गावातील बेरोजगारांना नोकरीत सामावून घेण्यात यावे आणि प्रकल्पग्रस्त शेतकरी यांना उदरनिर्वाहासाठी सदर रेल्वे स्थानकात जागा उपलब्ध करून देण्यात यावी.या मागणी साठी सिडको आणि रेल्वे प्रशासन कार्यालयावर २३ मार्च २०२३ रोजी सकाळी ठिक १०-३० वाजता मोर्चा काढण्याचा एकमुखी ठराव धुतूम ग्रामपंचायत मध्ये घेण्यात आला आहे.

यावेळी सरपंच सौ सुचिता प्रेमनाथ ठाकूर, उपसरपंच कविता ठाकूर,माजी सरपंच अमृत ठाकूर,माजी सरपंच शंकर ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य प्रेमनाथ ठाकूर,प्रकाश ठाकूर, चंद्रकांत ठाकूर,रविनाथ ठाकूर, सुचिता कडू,स्मिता ठाकूर,अनिता ठाकूर,कमळाकर पाटील,माजी उपसरपंच शरद ठाकूर,काँग्रेस गाव अध्यक्ष शंकर ठाकूर, रामनाथ ठाकूर,कुष्णा ठाकूर,शंकर ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कडू,अरुण ठाकूर, उद्योगपती नारायणशेठ ठाकूर, ग्रामसेवक विलास म्हात्रे सह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# उरण महिला सामाजिक व सांस्कृतिक संस्थेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त महिलादिन सप्ताह उपक्रम

**उरण दि. १८ ( दिनेश पवार ) : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून उरण महिला सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था उरण यांच्या वतीने महिला दिन सप्ताह उपक्रम राबविण्यात आला. महिला दिन ( दि. ४ ) रोजी महिला दिन मेळावा सादर करण्यात आला .त्याच प्रमाणे ८ मार्च ते १४ मार्च पर्यंत महिला सापाह उपक्रम राबविण्यात आला. ८ मार्च रोजी सकाळी ७ वाजता विमला तलाव येथील मॉर्निंग कट्टा ग्रुप सोबत महिला दिन साजरा करण्यात आला .त्या कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष अफषा मुकरी होत्या .मॉर्निंग कट्टा च्या वतीने महिलांना पुष्पगुच्छ देऊन महिला दिन साजरा केला .त्याच दिवशी गाडे हॉस्पिटल मध्ये ज्या महिलांना मुली जन्माला आल्या त्या महिलांना नवजात कन्या रत्न म्हणून सन्मान करण्यात आला. त्या कार्यक्रमाच्या कार्याध्यक्ष चंदा मेवाती होत्या.**



९ मार्च रोजी वहाळ येथील गोरक्षनाथ मंदिरात भाविकांसाठी असलेल्या भंडार्या साठी धान्य वाटप आणि देणगी देण्यांत आली .कार्यक्रमाच्या कार्याध्यक्ष शिल्पा शेडगे होत्या. १० मार्च रोजी उरण येथील पिरवाडी आदिवासी वाडीतील मुलांना पौष्टिक खाऊ वाटप कार्याध्यक्ष अश्विनी धोत्रे यांनी केले .ङ्ग११ मार्च रोजी विमला तलाव येथे सकाळी योग साधना कार्यक्रम घेऊन योगाचे महत्व पटवून दिले कार्यक्रमाचे कार्यध्यक्ष स्मिता पाटील होत्या . १२ मार्च रोजी उरण नगरपरिषदचे महाराष्ट्र भुषण डॉ .श्री नारायण विष्णू धर्माधिकारी उरण शाळा क्रमांक .१ व २ शाळेत सर्वांसाठी मोफत नेत्र तपासणी चिकित्सा शिबीर व महिलांसाठी आरोग्य शिबीर ,घेण्यात आले.कार्याध्यक्ष प्रियांका पाटील होत्या .१३ मार्च रोजी सी .बर्ड विशेष मुलांची शाळा येथे व्यायामा साठी उपयुक्त साहित्य वाटप केले कार्यध्यक्ष अर्चना पटेल होत्या .१४ मार्च रोजी उरण नगरपरिषदेचे महाराष्ट्र भुषण डॉ .श्री नारायण विष्णू धर्माधिकारी कन्या शाळा क्रमांक .१ व २ उरण शाळेत शैक्षणिक वस्तू व खाऊ वाटप केले कार्याध्यक्ष गीता पवार होत्या .आदि उपक्रम राबविण्यात आले .

उपक्रम यशस्वी करण्यासाठी उरण महिला सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था उरण संस्थापकीय अध्यक्षा सौ. गौरी देशपांडे ,महिला मेळाव्याच्या कार्याध्यक्षा गौरी हेमंत मंत्री, सचिव निशा शिरधनकर ,खजिनदार अॅड वर्षा पाठारे , कल्याणी दुखंडे, प्रमिला गाडे , दिपाली शिद्रे, सीमा घरत, निलिमा थळी, अफशा मुकरी,प्रगती दळी, दिपा मुकादम ,नाहिदा ठाकूर ज्योस्ना येरुणकर ,संगीता पवार , शुभांगी शिंदे, संध्याराणी ओहोळ , अनिता कोळी, प्रियांका पाटील , गीता पवार आदींनी मेहनत घेतली.

# सफाई कामगारांना वारसा हक्कांच्या लाभाची माहिती देण्यासाठी बैठकीचे आयोजन

यावेळी महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने लाड -पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या सुधारीत तरतुदी बाबत सफाई कामगारांना माहीती देण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागात कार्यरत कायम सफाई कामगारांना लाड -पागे समिती अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वारसा हक्काबाबत, सेवानिवृत्त, स्वेच्छा निवृत्त झाल्यावर ,वैद्यकिय दृष्ट्या अपात्र झाल्यास , सेवेत असताना दिवंगत झाल्यावर मिळणा-या लाभाबाबत माहिती देण्यात आली. या अनुषंगाने सफाई कर्मचाऱ्यांनी घ्यावयाची दक्षता, नियुक्ती प्राधिकरण समितीच्या जबाबदाऱ्या याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

महापालिकेने २०१८पासुन लाड-पागे शिफारशीखाली ४६ वारसदारांना नोकरीचा लाभ दिला आहे. तसेच महापालिकेने अनुकंपाखाली २५ वारसदारांना नोकरीचा लाभ दिला आहे.

महापालिका प्रशासनाने बैठकीमध्ये दिलेल्या या माहितीबद्दल सफाई कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी सतीश चिंडालिया यांनी समाधान व्यक्त करून पालिका प्रशासनाचे आभार मानले.

# सुषमा स्वराज पुरस्काराने सन्मानित महिलांचे मराठा महासंघाकडून अभिनंदन

मानसी कदम तसेच सौ स्वाती मोहिते आई डे केयर संस्थापिका, सौ सोनाली वारकर(पवार) यांना सामाजिक व कला क्षेत्रातील कार्या बद्दल सन्मानित करण्यात आले यावेळी चित्राताई वाघ, प्रितमताई पाटील, निलिमाताई पाटील तसेच इतर महिला पदाधिकारी उपस्थित होते.सन्मानित करण्यात आलेल्या महिलांचे अखिल भारतीय मराठा महासंघ पेण तालुका यांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# रायगड सुरक्षा रक्षकाने तलावात बुडताना वाचविला आठ वर्षांच्या मुलाचा जीव

रसायनी दि. १८ (राकेश खराडे) : रायगड सुरक्षा रक्षक दीपक बाळकृष्ण कदम कर्तव्य बजावत असताना महात्मा गांधी उद्यान, देवाळे तलाव (पनवेल)



येथील ८ वर्षांचा मुलगा तलावात ७ ते ८ फूट खोल पाण्यात बुडत असताना सुरक्षा रक्षक दीपक बाळकृष्ण कदम यांनी आपल्या स्वतःच्या जिवाची पर्वा न करता सर्वस्व पणाला लावत त्या लहान मुलाला सुरक्षितपणे बाहेर काढले.

एखाद्याचे प्राण वाचविण्याचे भाग्य आणि पुण्य दुसरं कोणतं असू शकतं ? स्वतःचा जीव धोक्यात टाकून जो इतरांचा जीव वाचवतो तोच खरा भाग्यवान असतो याचे ज्वलंत उदाहरण दिपक कदम यांनी दाखवून दिले आहे. दीपक बाळकृष्ण कदम यांच्या हातून यापुढेही अशीच चांगल्या कामाची अपेक्षा ठेवत आज यशवंत सेना, रायगड जिल्हाच्या वतीने रविंद्रजी रमेश बावदाने यांच्या मार्गदर्शनाखाली दीपक बाळकृष्ण कदम यांना गौरवपत्र देऊन शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रमुख उपस्थित मान्यवर मुख्य रायगड जिल्हा संघटक संतोष शिंगाडे, खालापूर तालुक्यातील समाजसेवक, युवा उद्योजक चंद्रकांत बावदाने जिल्हाध्यक्ष रामभाऊ केंडे यांनी सांगितले.

# वयोवृध्द महिलांचा पाठलाग करून चैन चोरणारा ओला चालक गजाआड २।। लाखाचा मुद्देमाल जप्त

अशाप्रकारचे १० ते १२ दिवसांमध्ये ४ चोरीच्या घटना घडल्याने सदर गुन्हेगारास अटक करून चैन स्नॅचिंग गुन्हयांना प्रतिबंध करणे व घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याचे मोठे आव्हान मुंब्रा पोलीसांसमोर होते. वयस्कर महिलांना टार्गेट करून त्यांचे दागिने चोरी होत असल्यामुळे जनमानसामध्ये गुन्हेगारास पकडून घडणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याची मागणी होत होती. त्यानुसार मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन. बी. कोल्हटकर यांनी गुन्हयांच्या घटनास्थळी भेट देवून सदर गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मुंब्रा व दिवा गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि शेळके, बोरसे व अमंलदार यांची दोन पथके तयार करून गुन्हेगाराची गुन्हे करण्याची पध्दत, गुन्हे करण्यासाठी वापरलेले वाहन तसेच इतर तांत्रिक व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने आरोपी निष्पन्न करून त्यास अटक करणेबाबत वेळोवेळी मार्गदर्शन व पाठपुरावा केला. सदर पथकांनी ४ चैन जबरी चोरीचे गंभीर गुन्हे उघडकीस आणण्याकरिता अविरत परिश्रम करून दिवा, खर्डीगाव, मुंब्रा व शिळफाटा परिसरातील सुमारे ११० खाजगी व महानगरपालिकेचे सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज संकलन केले. सदर सी.सी.टी.व्ही फुटेजचे बारकाईने निरीक्षण करून आरोपीने गुन्हयात वापरलेली मोटारसायकल व त्याचा जाण्या-येण्याचा मार्ग निष्पन्न केला. सदरचा आरोपी हा गुन्हे करून खर्डी गाव परीसरात जात असल्याचे आढळून आल्याने नमुद पथकांनी अहोरात्र सापळा लावून आरोपीस निर्मलनगरी खर्डी गाव येथून शिताफीने पाठलाग करून ताब्यात घेतले. कमलेश रामानंद गुप्ता (वय ३३ वर्षे) असून तो एक ओला चालक आहे. त्याला पोलिसांनी अटक केली. पोलीस कोठडी दरम्यान आरोपीकडे केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामध्ये त्याने ठाणे पोलीस आयुक्तालयातील चैन जबरी चोरीचे ४ गुन्हे व चोरीचे २ गुन्हे केल्याचे उघडकीस आले असून, गुन्ह्यातील १,९१,१४८ रुपये किंमतींचा ६१ ग्रॅम सोन्याचे दागिने व जबरी चोरीचे गुन्हे करण्याकरीता त्याने नौपाडा हददीतून चोरी केलेली ६०,०००/- रु. किंमतीची मोटार सायकल असा एकुण २,५१,१४८ रु किंमतीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरची उल्लेखनीय कामगिरी मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन. बी कोल्हटकर, पोलीस निरीक्षक संजय पवार, बाबासाहेब निकम, सहायक पोलीस निरीक्षक शहाजी शेळके, कृपाली बोरसे, संतोष उगलमुगले, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र किंगरे पोलीस अमंलदार सुभाष मोरे, जयेश तामोरे, योगेश पाटील, किशोर वैरागकर, निलेश लोंढे, प्रमोद शिंदे, उमाकांत गायकवाड, प्रमोद जमदाडे व अजीत येळे यांनी केली आहे. पुढील तपास सपोनि शेळके करत आहेत.

# परवडणारी घरे देण्याच्या नावाखाली फसवणूक करणारा व्यावसायिक जेरबंद

पनवेल दि. १८ ( वार्ताहर ): सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाची थेट कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. स्वप्नपूर्ती होम्स प्रायव्हेट लिमिटेड या वादग्रस्त कंपनीचा संचालक शरद अमृत मोझर याला प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय तळेकर यांच्या आदेशाने थेट कारागृहात पाठविण्यात आले आहे.

लिलावात काढलेली मालमत्ता विक्री न झाल्यामुळे पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी हा निर्णय घेतला. पनवेलमध्ये असे फसवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असल्याने हा फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना मोठा झटका मानला जात आहे. पनवेल तालुक्यातील विहिघर, नेरे, हरिग्राम आदी भागात गृहप्रकल्प उभे राहत असल्याचे भासवून स्वप्नपूर्ती होम्स या विकसक कंपनीने २०१६ साली सुमारे २५० ग्राहकांची ६ ते ७ कोटींची फसवणूक केली होती. घर बुक करणाऱ्या ग्राहकांकडून घराच्या किमतीच्या २० टक्के रक्कम जमा करून प्रत्यक्षात गृहप्रकल्पाचे काम पूर्ण केले गेले नाही.

दैनिक किल्ले रायगड या वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्या संदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी दैनिक किल्ले रायगड घेणार नाही. दैनिक किल्ले रायगड या वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहनिशा वाचकांनीच करुन संबंधितांशी व्यवहार करावेत. त्या संदर्भात प्रसिध्द झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी दैनिक किल्ले रायगड चे मालक मुद्रक,प्रकाशक व संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक किल्ले रायगडच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. : **संपादक**

हे वृत्तपत्र मालक मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रमोद लक्ष्मण वालेकर यांनी सिध्दकला प्रिंट मिडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून दैनिक किल्ले रायगड कार्यालय, १०/११ साहील सोसायटी, सिटी पोस्ट ऑफिस समोर, एम. पी. रोड, पनवेल ४१० २०६, ता. पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. कार्यालयीन फोन नं. :(022) 2745 9673, Email: killeraigad @ gmail. com. ❐ RNI Regn. No. 16725/67.